# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 26.05.2024** **वार-रविवार**

---

1.लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात ५८ मतदारसंघांमधे 63 टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज.

2.पुण्यातील लष्करी क्रिडा संस्थेमधील मुलींच्या क्रिडा तुकडीचं आणि खेलो इंडिया युथ वसतिगृहाचं उद्घाटन.

3.इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या ऑनलाइन जाहीर होणार.

4.पायल कपाडिया यांच्या -ऑल वी इमॅजिन इज लाईट- चित्रपटाला कान महोत्सवात ग्रांप्री पुरस्कार; आणि

5.कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज तर  विदर्भात उष्णतेच्या लाटेची शक्यता.

**लोकसभा मतदान**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी काल सहा राज्यं आणि दोन केंद्रशासीत प्रदेशातल्या ५८ मतदारसंघासाठी काल रात्री 11 वाजेपर्यंत 63 टक्क्यांहून अधिक मतदान झाले. उत्तरप्रदेशातल्या १४, हरियाणा- सर्व १०, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये प्रत्येकी ८, दिल्लीत ७, ओडीशामध्ये ६, झारखंड -४ आणि जम्मू काश्मीरमधल्या एका मतदारसंघासाठी मतदान झालं. जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग-राजौरी मतदारसंघात गेल्या ३५ वर्षांत सर्वाधिक ५२ टक्क्यांहून अधिक मतदान झालं आहे. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक, 79 टक्क्यांहून अधिक मतदान झालं. या टप्प्यात भाजपाचे ज्येष्ठ नेते धर्मेंद्र प्रधान, मनोहरलाल खट्टर, मनेका गांधी, मनोज तिवारी, तसंच काँग्रेसचे नेते दीपेंदर सिंह हुड्डा, कुमारी शैलजा, राज बब्बर आणि कन्हैय्या कुमार यांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं आहे. लोकसभेच्या 486 जागांसाठी आतापर्यंत मतदान पूर्ण झालं आहे. सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान 1 जून रोजी होणार आहे. या टप्प्यात 57 जागांवर मतदान होणार आहे. दरम्यान सातव्या आणि अंतिम टप्प्यातील मतदानासाठी सर्वच राजकीय पक्ष जोरदार प्रचार करत आहेत. 4 जून रोजी मतमोजणी होणार आहे.

**ईव्हीएम छेड छाड**

मतदान प्रक्रिया बाधित होत आहे असं दाखवणारे आणि ईव्हीएममध्ये छेडछाडीचा प्रयत्न होत असल्याचे दाखवणारे इतर राज्यांमधील काही जुने व्हिडिओ समाज माध्यमांद्वारे प्रसारित केले जात असल्याचे निदर्शनास आलं आहे. असे व्हिडिओ महाराष्ट्र राज्यातील यंदाच्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीशी संबंधित नाहीत. राज्यातील मतदान प्रक्रिया ही संपूर्णपणे शांततेत आणि सुरळीत झालेली असल्याचं राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं स्पष्ट केलं आहे.

**लष्करी क्रीडा**

पुण्यातील लष्करी क्रिडा संस्था आणि महू इथल्या लष्करी क्रीडा संस्थेत मुलींच्या क्रिडा तुकडीचं आणि खेलो इंडिया युथ वसतिगृहाचं उद्घाटन लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं. या वेळी भारतीय क्रिडा प्राधिकरणाचे महासंचालक संदीप प्रधान आणि भारतीय ॲथलेटिक महासंघाच्या उपाध्यक्ष अंजु बॉबी जॉर्ज यांच्यासह भारतीय क्रिडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. लष्करी क्रीडा संस्थेत उपयुक्त पायाभूत सुविधांसोबत, क्रीडा औषधी, पूरक आहार, खेळाडू पुनर्वसन सुविधा उपलब्ध होतील असं

जनरल मनोज पांडे यावेळी म्हणाले. क्रीडा प्राधिकरणातर्फे उभारण्यात आलेल्या वसतीगृहाचा उपयोग ऑलिंपिकसाठी तयारी करणाऱ्या खेळाडूंना होणार आहे. यासाठी १ हजार १२४ मुलींमधून २४ मुलींची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे.

**नियुक्ती**

खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या कमांडंटपदी व्हाइस ॲडमिरल गुरूचरणसिंह यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी काल मावळते कमांडंट व्हाइस ॲडमिरल अजय कोच्च्छर यांच्याकडून पदभार स्विकारला.गुरूचरणसिंह हे एनडीएचे माजी विद्यार्थी आहेत. १ जुलै १९९० मध्ये ते भारतीय नौसेनेमध्ये दाखल झाले.

**दहावी निकाल**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाचा इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल २७ मे म्हणजे उद्या सोमवारी दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर केला जाणार आहे. मंडळाने दिलेल्या विविध संकेतस्थळावर हा निकाल विद्यार्थ्यांना पाहता येणार आहे. गुणपडताळणीसाठी आणि गुणपत्रिकेच्या छायाप्रतींसाठी २८ मे ते ११ जून या काळात मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनं  अर्ज सादर करता येणार आहेत. तर यावर्षी जुलै-ऑगस्टमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी ३१ मे पासून मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरून घेण्यात येणार आहेत.

**इंट्रो-गिरीप्रेमी**

पुण्यातील गिरी प्रेमी संस्थेच्या सहकार्याने ममता अंध कल्याण केंद्रातील 22 दृष्टीहिन विद्यार्थ्यांची हिमालय मोहीम नुकतीच पार पडली. 17 ते 23 मे दरम्यान पार पडलेल्या या मोहिमेत विद्यार्थ्यांनी मनाली इथल्या दहा हजार फूट उंचीवर असणारा जगातील सर्वात मोठा अटल बोगदा पार करून खोक्सर या ठिकाणी बर्फाचा आनंद लुटला. या मोहिमेच्या अनुभवाविषयी अंध केंद्रातील बळिराम दराडे या विद्यार्थ्यांनं आकाशवाणीशी संवाद साधला...

**पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे व्यवसायिक आणि प्रायोगिक नाटकांसाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. व्यवसायिक मराठी रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट लेखकाचा पुरस्कार संकर्षण कऱ्हाडे यांना तर व्यवसायिक दिग्दर्शकाचा पुरस्कार चंद्रकांत कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट व्यवसायिक नाटक म्हणून 'नियम व अटी लागू' या नाटकाला पुरस्कार जाहीर करण्यात आला. प्रायोगिक रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट लेखक पुरस्कार इरफान मुजावर यांना जाहीर करण्यात आला आहे. सर्वोत्कृष्ट व्यवसायिक संगीत नाटक म्हणून रंगशारदा प्रतिष्ठान या संस्थेच्या 'डबल लाईफ' या नाटकाची निवड करण्यात आली आहे. सर्व पुरस्कार प्राप्त कलावंत आणि तंत्रज्ञाना मुंबईत येत्या १४ जून रोजी पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली आहे.

**कपाडीया**

चित्रपट निर्मात्या पायल कपाडीया यांच्या ऑल वि इमॅजिन इज लाईट या चित्रपटाला कान चित्रपट महोत्सवात ग्रां प्री पुरस्कार मिळाला असून हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या पहिल्या निर्मात्या ठरल्या आहेत.  या सोहोळ्यातील हा दुसरा सर्वात प्रतिष्ठेचा पुरस्कार समजला जातो. मानाचा Palme d'Or पुरस्कार अमेरिकी दिग्दर्शक सीन बेकर यांच्या अनोरा चित्रपटाला मिळाला. गेल्या तीस वर्षात या सोहोळ्याच्या मुख्य स्पर्धेत दाखवण्यात आलेला पायल कपाडिया यांचा चित्रपट दोन बाबतीत महत्वाचा ठरला. गेल्या तीस वर्षातील तो पहिला भारतीय चित्रपट आहे तर भारतीय महिला दिग्दर्शकाचा पहिलाच चित्रपट ठरला. ऑल वी इमॅजिन इज लाईट ची निर्मिती भारत-फ्रान्सनं केली असून त्यात प्रभा नावाच्या परिचारिकेची कथा सांगितली आहे. तिला सोडून गेलेल्या पतीकडून तिला अनपेक्षित भेटवस्तू मिळाल्यानंतर तिचं जीवन विस्कळीत होतं अशी त्याची मध्यवर्ती कथा आहे.

**अटक**

कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपी मुलाचे आजोबा सुरेंद्र अगरवाल यांना काल पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी दिली आली आहे. मुलासोबत असलेल्या चालकाला धमकावणे आणि डांबून ठेवल्या प्रकरणी गुन्हे शाखेकडून त्यांना अटक करण्यात आली आहे.

**पोलिस ड्राईव्ह-**

पुण्यातील कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर यवतमाळमध्ये वाहतूक पोलिसांनी वेगानं गाड्या चालविणाऱ्या अल्पवयीन मुलांवर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. अल्पवयीन मुला-मुलींच्या हातात दुचाकी, चारचाकी वाहनं देण्याचं प्रमाण वाढलं आहे. परवाना नसणं, नियमबाह्य पद्धतीनं वाहन चालविणं, मोठ्यानं आवाज करणारे सायलेन्सर, हॉर्न आदी वाहनांवर दंडात्मक कारवाया सुरू केल्या आहेत.

**मद्यकारवाई**

पुण्यामध्ये अल्पवयीन मुलांना मद्य पुरविणाऱ्या पबवर कारवाई करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर धुळे जिल्हा पोलिसांनी अल्पवयीन मुलांना मद्य विक्री करणाऱ्या दुकानांवर कारवाई सुरु केली आहे. पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांच्या आदेशानं धुळे शहरातील परवानाधारक मद्य विक्रेत्यांवर लक्ष ठेवून गुन्हे दाखल केले आहेत.

**तिफण**

तिफण या स्पर्धेमुळं विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळून त्यातून नविन स्वयंचलीत यंत्रांची निर्मिती विद्यार्थ्यांकडून होत असल्याचं भोपाळ इथल्या, केंद्रीय कृषि अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ. सी.आर. मेहता यांनी म्हटलं आहे. राहुरी इथल्या महात्मा फुले कृषि विद्यापीठ, आणि सोसायटी ऑफ ऑटोमोटीव्ह इंजिनियर्स यांनी संयुक्तपणे राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान तिफण-2024 या ट्रॅक्टरचलीत भाजीपाला पुनर्लागवड यंत्र या विषयावरील स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते काल बोलत होते.

**पाणी**

गोंदिया जिल्ह्यात आता पाणी टंचाई जाणवू लागली आहे. गोंदिया शहरातील अनेक भागातील नगरपरिषदेची नळ जोडणी बंद असल्याने नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. या प्रमुख मागणीला घेऊन शिवसेना ठाकरे गटाच्या वतीनं नगरपरिषदेवर धडक मोर्चा काढण्यात आला.

**पर्यटनबंद**

पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीन सिंधुदुर्ग जिल्ह्यातलं सर्व प्रकारचं जलपर्यटन २६ मे ते ३१ ऑगस्ट या कालावधीत बंद राहणार आहे. बंदर आणि पर्यटन विभागानं याबाबतचे आदेश काढले आहेत. मे महिन्यातला पर्यटन हंगाम १५ मे नंतरच मोठ्या प्रमाणात सुरू होतो. त्यामुळे मासेमारी हंगामाप्रमाणे ३१ मे पर्यंतचा हंगाम कायम करावा, अशी मागणी होडी व्यावसायिकांनी केली होती.

**पाऊस नुकसान**

गेले काही दिवस सिंधुदुर्ग जिल्ह्यात सोसाट्याचा वारा आणि वीजांसह पडत असलेल्या पावसामुळं मोठी हानी झाली आहे. अनेक ठिकाणी मोठी झाडं जमीनदोस्त तसंच घरं, गोठे यांची पडझड झाली आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानं नागरिकांचे हाल झाले.

**हवामान**

देशाच्या उत्तर आणि वायव्य भागात उष्णतेची लाट सुरू आहे. हवामान विभागानं देशाच्या वेगवेगळ्या भागात लाल आणि नारिंगी बावटे फडकवले आहेत. राजस्थान, पंजाब, हरियाणा, चंदीगड, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, मध्यप्रदेश आणि गुजरातमध्ये  उष्णतेची तीव्र लाट, दोन ते तीन दिवस राहण्याची शक्यता आहे.  येत्या ३१ तारखेपर्यंत कोकण, आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची, तर येत्या बुधवारपर्यंत विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. काल सर्वात जास्त तापमानाची नोंद अकोला इथं 45 पुर्णांक 8 अंश सेल्सिअस करण्यात आली.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं बातमीपत्र संपलं, नमस्कार.